# अमरावती महानगरपालिका अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती

जा. क्र. अमनपा/ पर्या /आयु/ १११ /२०२३.

दिनांक :- 20/09/2023

## जाहिर सुचना

महानगरपालिका क्षेत्रातील उत्कृष्ट सार्वजनीक गणेशोत्सव मंडळांना महानगरपालिकेतर्फे पुरस्कार देणेबाबत.

अमरावती शहरातील सर्व सार्वजनीक गणेशोत्सव मंडळांना अवगत करण्यात येते की, महानगरपालिका क्षेत्रातील गणेश मंडळांकरीता घोषीत करण्यात आलेल्या 'पर्यावरणपुरक गणेश मंडळ' स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या नोंदणीकृत गणेश मंडळांना मुल्यमापनाअंती पारीतोषीक देण्यात येणार असून प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास रू. ५१०००/-, व्दितीय क्रमांकाच्या विजेत्यास रु. २१०००/- व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास रु. ११०००/- इतक्या रक्कमेचे पारितोषीक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

सदरहु स्पर्धेत सहभाग नोंदविलेल्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची निवड करीत असतांना प्रामुख्याने खालील नमुद बाबींचे मुल्यमापन करण्यात येणार आहे.

१- सन २०२३ गणेशोत्सवाकरीता अमरावती महानगरपालिका झोन कार्यालयात मंडळाची नोंदणी असणे तसेच पोलीस विभागाची परवानगी / नाहरकत अनिवार्य राहील.

२- श्रींची मुर्ती मातीची असणे अनिवार्य राहील.

३- श्रींची मुर्ती मातीची असल्याबाबत अधिकृत मातीचे मुर्ती विक्रेत्याकडून खरेदी केल्याची पावती सोबत जोडावी.

४- सार्वजनीक गणेश मंडळाला परवानगी देत असतांना परवानगी पत्रात नमुद केलेल्या ध्वनीप्रदुषणाबाबतच्या तसेच इतर अटी शर्तीचे पालन करणे अनिवार्य असेल.

५- सजावटीसाठी सिंगल युज प्लास्टिक व थर्माकोल वापर केलेला नसावा.

६- अमरावती महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.amravaticorporation.in यास भेट देवून नोंदणीकृत मंडळाने स्पर्धेमध्ये सहभाग घेणे अनिवार्य राहील.

७- मंडळाकडून करण्यात येणारा देखावा सिंगल युज प्लास्टिक बंदी , स्वच्छता , वृक्ष लागवड इ.पर्यावरणपुरक उपक्रमासंदर्भातील जनजागृती बाबतचा देखावा असावा.

त्याअनुषंगाने स्पर्धेत सहभाग नोंदविण्याकरीता अंतीम दिनांक २४/०९/२०२३ असुन जास्तीत जास्त सार्वजनीक गणेशोत्सव मंडळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

आयुक्त

महानगरपालिका अमरावती